# मेट्रो-३साठी वाजवी सौदा

## यशस्वी वाटाघाटींमुळे कॉर्पोरेशनचा फायदा

Jayant.howal
@timesgroup.com

**मुंबई :** मेट्रो-३च्या बांधकामासाठी राजकीय पक्षांना पर्यायी जागा देणाऱ्या मुंबई पोर्ट ट्रस्टला भाड्यापोटी महिन्याला सुमारे ३८ लाख रुपये तर अन्य सरकारी कार्यालयांना जागा देणाऱ्या दक्षिण मुंबईतील खासगी इमारतींना महिन्याला २४ लाख रु. इतकी रक्कम मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनला अदा करावे लागणार आहेत. प्रति चौरस फूट २०० रु. या दरावर कॉर्पोरेशन ठाम राहिल्यामुळे आणि यशस्वी वाटाघाटी केल्यामुळेच हा व्यवहार कॉर्पोरेशनसाठी बऱ्यापैकी वाजवी ठरल्याचे मानले जाते.

मेट्रो-३च्या मार्गात आठ राजकीय पक्षांची आणि आठ सरकारी अशी १६ कार्यालये येतात. या कार्यालयांचे तात्पुरते स्थलांतर आवश्यक होते. संबंधितांना स्थलांतरासाठी जागावाटप करण्याबाबत बुधवारीच सरकारने परिपत्रक काढले आहे.

कार्यालयांच्या स्थलांतरासाठी भाडेतत्वावरील जागेसाठी कॉर्पोरेशनने टेंडर मागवले होते. परंतु जागा देण्यास इच्छुक असलेल्या ११ खासगी कंपन्यांनी प्रति चौरस फूट साधारणपणे २५० ते ४०० रु. भाव लावला होता. हा दर महागडा असल्याने पुन्हा टेंडर मागवण्यात आले. २०० चौरस फुटाने जागा उपलब्ध करून देणाऱ्यांनाच प्राधान्य देण्याचे कॉर्पोरेशनने ठरवले. परिणामी, या दुसऱ्या टेंडरला अपेक्षित प्रतिसाद मिळाला.




नरिमन पॉईंट येथील एका खासगी इमारतीमधील सुमारे १२ हजार ९४२ चौरस फूट जागा कॉर्पोशनने भाड्याने (कार्पेट रेटने) घेतली आहे. त्यासाठी प्रति चौ.फू. २०० रु. दराने दरमहा २४ लाख रु. भाडे द्यावे लागणार आहे. या भागातील जागांचे दर पाहता दुप्पट भाडे द्यावे लागले असते. पण कॉर्पोरेशनने केलेल्या यशस्वी वाटाघाटींमुळे कमी दर मिळाला. शिवाय भाडेतत्त्वावर जागा घेताना दरवर्षी होणारी भाडेवाढही द्यावी लागणार नाही, असे कळते. भाडेतत्त्वावरील अन्य जागांबाबतही असाच दर मिळाला आहे. त्यामुळे हा व्यवहार वाजवी ठरल्याचे मानले जाते. सेवाकर जमेस धरता प्रति चौरस फूट २०० रु. दर मिळाला हेही विशेष!

मुंबई पोर्ट ट्रस्टने तर इतरांपेक्षा २० ते २५ रू. (प्रति चौ.फू.) कमी दर आकारला. पोर्ट ट्रस्टकडून ३५९९५.२१ चौ.फू. जागा घेण्यात आली असून महिन्याचे भाडे सुमारे ३८ लाख ७३ हजार आहे. पोर्ट ट्रस्टने दोन वर्षाची अनामत रक्कम म्हणून सुमारे ९ कोटी मागितले आहेत. परंतु वाटाघाटींनंतर अनामत रक्कमेसंदर्भात तोडगा निघू शकतो.

### एअर इंडियाची नकारघंटा

जागेसाठी नरिमन पॉइंट येथील एअर इंडियाच्या मुख्यालयाकडेही विचारणा करण्यात आली होती. परंतु त्यांनी वाटाघाटी तर दूरच, पण प्रतिसादच दिला नाही, असेही कळते.

### एमटीएनएलचा चढा दर

खासगी मालकांना पैसे देण्यापेक्षा सरकारच्याच अन्य यंत्रणांच्या जागा घेण्यास प्राधान्य देण्यात आले होते. मुबलक जागा असणारे मुंबई पोर्ट ट्रस्ट आणि मुंबई महानगर टेलिफोन निगम या दोन सरकारी यंत्रणा त्यासाठी डोळ्यासमोर होत्या. पोर्ट ट्रस्टने सहकार्याचा हात दिला. परंतु एमटीएनएलच्या पाच जागांचे दर मात्र २०० चौ.फु.पेक्षा जास्त असल्याने त्यांच्याशी व्यवहार झाला नसल्याचे कळते.